ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 9 | MAY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# उदगीर शहरातील सुफी संतांच्या दर्ग्यांच्या वास्तुचा ऐतिहासिक अभ्यासक



डॉ. लदाफ एस.के.
इतिहास विभाग , आझाद महाविद्यालय , औसा
ता. औसा जि. लातूर (महाराष्ट्र).

**प्रस्तावना :-**

उदगीर हे गाव उतारावर वसल्यामुळे गावाच्या जवळ येईपर्यंत गावाचे दर्शन होत नाही. 1949 नंतर गावाची वाढ फार जलद गतीने झालेली आहे. स्वातंत्र्यापूर्वी शहराची मुख्य वस्ती सहा वेशीच्या आत वसलेली होती. अद्याप अस्तित्वात असलेल्या वेशीकडे बारकाईने पाहिल्यास उदगीरला सुध्दा बीदर, औरंगाबाद किंवा बु-हाणपूर सारखे चोहीकडून भिंतींचे तट होते असे दिसते. ़ेवणी वेस किंवा वेशीच्या बाहेर फार मोठ्या प्रमाणात वस्तीची वाढ झाल्यामुळे भिंतीच्या तटाचे कसलेच अवशेष दिसत नाहीत. परंतू पेठ दरवाजा, किल्ला वेस, कंधार वेस किंवा निडेवन वेशीच्या बाजूला पहिलयास अगदी ठळकपणे गावाच्या संरक्षणासाठी भिंतीचे तट होते.(1)

याचे अवशेष स्पष्ट दिसतात. यावरून असे सिध्द होते की, एके काळी हे अत्यंत महत्त्वाचे शहर असले पाहिजे. पन्नास ते साठ वर्षापूर्वी शहराचया चोहीकडे घनदाट नागफणीचे झाडे होती ती नष्ट करण्यात आली. शहराच्या उत्तरेला एका टेकडीवर एक सुंदर डाक वंगला आहे. या बंगल्याची बांधी या परिसराला अगदी नाविण्यपूर्ण आहे.हा बंगला केव्हा बांधला गेला याची माहिती मिळत नाही. परंतू बंगल्याच्या बांधकामावरुन ही शिल्पकला फ्रेंच पध्दतीची आहे असे म्हणतात.(2)

हजरत सय्यद शहादुल्ला ऊर्फ शहामहमद कादरी (र.अ.)

रेल्वे स्टेशन रोड उदगीर ईदगाहच्या बाजूस आहे व अवतीभोवती कब्रस्तान आहे.

हजरत सय्यद शहादुल्ला ऊर्फ शहामहमद कादरी (र.अ.) यांच्या पिढ्यांनपिढ्यांपासून किंवा त्यांच्या घराण्याविषयी माहिती घेतलयास असे दिसून येते की, ते महेबुब सुबानी यांच्या परिवाराशी संबंधित आहेत. तसेच त्यांच्या घराण्याविषयी माहिती घेतल्यास गोसुल आजम दस्तगीर शेख अब्दूल खादर जिलानी यांच्या वंशाशी संबंधित आहे. कोकण विभागातील भैरी कलयाण हे त्यांचे जन्मस्थान आहे. ते मुंबई शहराजवळ आहे. तेथे त्यांचे आजोबांची समाधी (दर्गा) सध्या अस्तित्त्वात आहे. हजरत शाहमहमद कादरी यांच्या आजोबाचे नाव सय्यद नुरोद्दिन ईस्माईलसाहब कादरी हे आहे. यांच्या चार पिढी (वंश) यांचे आजोबा हजरत सय्यद मिर्झा साहब कादरी बगदाद शरीफ येथून आले होते. मुंबईच्या जवळ असलेल्या नारायणपूर जवळीत कल्याणी येथे आपली जहांगीर वसविली. (3)

**सय्यद राजमहमद साहब (र.अ.) :-**

हा दर्गा उदगीर शहरातील चर्च रोडच्या बाजूस आहे. येथे एक मस्जीद कब्रस्तान आहे. त्यांच्या जन्मा विषयी मतभिन नता आहे. व तसेच जुने कागदपत्राचा आभाव आहे व तसेच कांही जुने पुस्तातून व मौखित माहिती व महाराष्ट्र शासन राजपत्राच्या आधारे व दर्ग्याचा संक्षिप्त इतिहास खालील प्रमाणे सांगता येईल.

हे हजरत सय्यद चांदसाबचे (र.अ.) चे जावाई आहेत. आपल्या बाबतील असे म्हटले जाते की, त्यांच्या ताब्यात (जीन) होते. त्यांच्याच मदतीने (जिन्नाच्या) सहाय्याने कटोरी (वाटी) एवढी विहिर खोदण्यात आली आहे. ती विहिर वाढी

एवढी आहे आणि ती विहिर आजसुदा अस्तित्वात आहे आणि ते फार मोठे व्यापारी होते व त्यांनी असे चमत्कार दाखविले होते की, त्यामुळे हिंदू-मुस्लिम दोन्ही धर्माचे लोक त्यांना मान देत असत. आजही त्यांचा दर्जा आजसुध्दा आहे त्यांचा संदल व उरुस (27 रजब) ला निघतो.

त्यात अनेक लोक सहभागी होत असत. आजसुध्दा या दर्ग्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. हा दर्गा चौकान आकृतीमध्ये बांधण्यात आला असून वरती गुमंद आहे. त्या गुमंदमध्ये कबर (समाधी) आहे आणि त्यांच्या समाधीवर फुले, नारळ फोडून प्रार्थना केली जाते. (4)

हजरत पीरमुसा कादरी (र.अ.) हा दर्गा उदगीरच्या पश्चिमेला व नांदेड - बिदर रोडच्या पूर्वेला एका टेकडीवर आहे. हा दर्गा उदगीर शहरामधुन कोठूनही पाहिल्यास हा दर्गा नजरेस पडतो व तसेच हा दर्गा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे व त्याच्या आजूबाजूस कब्रस्तान आहे. तसेच टेकडीवर एक मस्जीद आहे. या दर्ग्याला नऊ पाय-या चढून गेल्यानंतर पहिला दरवाजा लागतो. तो आता पडलेला असून प्रत्येक पायरीची उंची दोन फुट लांबी व एकोणीस इंच आहे. त्यात एक चार फुटाची कमान आहे. हा दरवाजा वढण्यासाठी तीन पाय-या आहेत. दरवाजाची उंची बारा फुट असून त्याच्या दोन्ही बाजूला चौकोनी ओटे आहेत. सहा सहा फुट उंचीच्या व चार फुट रुंदीच्या दोन कमानी आहेत. या दरवाजातून थोडे अंतर चालत गेल्यानंतर सात पाय-या लागतात आणि त्या पाय-या चढून गेल्यानंतर बारा पाय-या लागतात.हजरत पीरमुसा कादरी (र.अ.) यांचा दर्गा लागतो ह्या इमारतीची उंची तीस फुट असुन अठरा फुट लांबी-रुंदीच्या कट्टयावर बांधण्यात आली आहे. ह्या इमारतीत दगडाची कबर (समाधी ) आहे. तिच्यावर कसलाही आलेख नाही. दर्ग्याच्या व्यवस्थेसाठी 12 एक जमीन देण्यात आली आहे. पण आता तशी व्यवस्था नाही. आणि त्या उंच टेकडीवर अर्थात दर्ग्याच्या बाजूस एक मस्जीद आहे. तसेच टेकडीवर संपूर्ण उदगीर शहराचे दर्शन घडून येते व तसेच उदगीरचा किल्ला येथून स्पष्टपणे दिसतो व त्याच बरोबर समोर पाण्याचा तलाब दिसतो व तेथे एक तळवेस सुध्दा होती ती आज तळवेस व तलाव नामशेष झालेला दिसून येतो.

एकंदरीत हा दर्गा ऐतिहासिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण मानला जातो. या दर्गाला दिवा बत्ती व इतर खर्चासाठी 141 (बिगा) जमीन कब्रस्तान दफन निधीसाठी देण्यात आली आहे. या दर्ग्याचे सज्जादे म्हणून पिढ्यानपिढ्या ह्या दर्ग्याची सेवा करीत आहेत. या दर्ग्याचा उरुस दरवर्षी भरला जातो.दर्ग्याला लाईट रोशनी केली जाते. शरातील मान्यवर लोकांना आमंत्रित केले जाते व तसेच शहरातून प्रमुख ठिकाणापासून संदल काढला जातो. (उंटावर) गोरगरीब लोकांना जेवण दिले जाते व तसेच गोगरीब श्रीमंत सारेच लोक या उरुसात सहभागी होतात. यात कवालीचे कार्यक्रम घेण्यात येतात. त्यांच्या या उरुसाला उदगीर नगर परिषद पाणी पुरवठा सुध्दा करते.

हा दर्गा भातात पाच ठिकाणीआहे मानले जाते त्यपैकी एक हे उदगीर या ठिकाणी आहे. हजरत पीरमुसा कादरी हे बगदाद येथून आले आहे. परंतू यात मतभिन्नता आहे. त्यांची निशानी हिरवा झेंडा आहे. घोडा आणि शेर (सिंह) ते स्वारी करीत असत. कोल्डा-पट्टा- साप होता असे म्हटले जाते. आज त्याच नावाने उदगीर शहरात मुसानगर म्हणून ओळखले जाते.(5)

## हजरत सय्यद शहासैलानी :-

हजरत शहासेलानी हा दर्गा उदगीर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. त्यांच्या जन्माविषयी लिखित स्वरुपात माहिती उपलब्ध आहे. परंतू मौखिक स्वरुपात व तसेच महाराष्ट्र शासन राजपात्रात यांचा उल्लेख आलेला आहे. ज्याठिकाणी हा दर्गा आहे. त्यांच्या आजूबाजूस कब्रस्तान आहे व जवळच एक मस्जीद आहे. पण सद्या आज या मस्जिदमध्ये नमाज पडण्यासाठी भरपूर लोक येथे येतात व तसेच या दर्ग्याला लोक फारच श्रध्देने येत असल्याचा उल्लेख मौखिक स्वरुपात सांगातात. कारण भाविकांची जी काही इच्छा पूर्ण होत नवहती या दर्ग्यापासून पूर्ण होत असे.(6)

## हजरत सय्यद वल्लिसाब कादरी (र.अ.) :-

पेठ दरवाजा उदगीर हा दर्गाह (समाधी) उगीर येथेल असून या दर्ग्याविषयी लिखित पूराव उपलब्ध झालेला नाही. जी कांही माहिती मिळाली ती मौखित स्वरुपात व भेटी देऊन व तसेच महाराष्ट्र राजपत्रात त्याचा उल्लेख आलेला आहे. शेख इस्माईल यांच्या मते व 90 वर्षे हा दर्गा फार जुना आहे. कर्नाटकातील बसवकल्याण जि.बिदर येथून आले असल्याचा उल्लेख सांगातात. कारण हा दर्गा किल्ल्याच्या जवळ आहे. आणि आज ते उगीर शहरातील पेठ दरवाजा गल्ली म्हणून अस्तित्वात आहे. त्याठिकाणी एक पाण्याची विहिर आहे व एक मस्जीद आहे व एक मोठे झाड आहे. असे म्हटले जाते त्या झाडाला फुल लागते ते खाल्यास किंवा फुल उघडून पाहिल्यास त्याच्यातून साखर निघते असे म्हटले जात असत. ह्या दर्गाचा फार मोठ्या प्रमाणात उरुस (यात्रा) भरत असे व आजसुध्दा त्याचे मुजावर खिदमदगार संदल काढत असत आणि

आजसुध्दा अनेक भाविक उद-फुल- अगरबत्ती घेवून दर्ग्याला येतात व त्यांची सर्व इच्छा पूर्ण होत असे व तसेच वक-याची नवस सुदा केली जात असे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे हजरत सय्यद वल्लीसाब कादरी (र.अ.) यांचय दर्ग्यावर आपोआप फुलं व साखर येत असत असा हा कित्येक दिवस हा कार्यक्रम चालत असे परंतू येथील लोक म्हणतात की ते अचानकपणे आलेली साखर, फुल घ्यायचे असल्यास नियमितपणे (वजू) हातपाय धुवून ते वस्तू घेत असत. परंतू एके दिवशी अशी घटना घडली की एक अज्ञान व्यक्तीने (वजू) किंवा हात पाय न धुता त्या वस्तुला हात लावला तेव्हापासून साखर व फुल येण्याचे थांबले असे म्हटले जाते.

एकंदरीत हा दर्गा ऐतिहासिक दृष्टीने फार महत्त्वाचा होता असे म्हटले जाते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे हिंदू-मुस्लिम दोन्ही धर्मातील लोक दश्रनाला येत असत व प्रार्थना करीत असत. (7)

## हजरत शहा हुसेन सय्यद अफजल टिकटिकी :-

हजरत शाहाहूसेन सय्यद अफजल टिकटिकी यांचा दर्गा (समाधी) उदगीर शहरातील ऐतिहासिक चौबारा जुनी देवणी बेस रोडवरील व तसेच जुन्या शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेली ही एक महत्त्वपूर्ण मध्ययुगीन कालखंडातील महत्त्वपूर्ण दर्गा आहे. सय्यद शहाहुसेन सय्यद अफजल टिकटिकी (र.अ.) यांचा जन्म भेवळी (भेवरी), कल्याण मुंबई जवळील असलेले हजरत गौसुल आजम दस्तगीर शेख अब्दूल कादरी जिलानी यांच्या वंशाशी संबंधीत आहेत व तसेच हजरत शहामहदम कादरी यांच्या बहिणीचा मुलगा तर निलंगा येथील हजरत पीरपाशा नुरहलक्क यांचे मुरशेद. उदगीर येथील जनतेचे म्हणणे आहे की, उदगीर येथील ऐतिहासिक चौबारा जवळ एक मठ आहे. (आज त्याला शंकरप्पा महाराजांचा मठ म्हणून अस्तित्वात आहे.) दररोज हजरत शहाहूसेन अफजल (र.अ.) दररोज मठाकडे जात असत तेही न विसरता आणि एक उंच ठिकणी बसून सुर्याला तासनतास टक लावून बघत असत ते डोळ्यांचा एक पलक न मारता सुर्याकडे बघत असत. त्यामुळे त्यांना हजरत शहाहुसेन सय्यद अफजल टिकटिकी असा किताब देण्यात आला होता. त्यामुळे त्यांचे टिकटिकी असे नाव पडले.

## हजरत शाहहुसेन सय्यद अफजल टिकटिकी अखेरचे दिवस :-

हजरत शाहहुसेन अफजल टिकटिकी यांचा मृत्यु ऐतिहासिक चौबारा उदगीरजवळील खानखा ए (उदगीर) येथे झाला आणि त्यावेळेस जनतेने असा विचार केला की हजरत शहामहमद कादरी (र.अ.) यांच्या जवळ त्यांची दफनविधी करावी असा विचार मांडला. परंतू (त्यांचा थडगा) उचलण्याचा प्रयत्न केला. परंतू ते कुणालाही उचलता येत नव्हते. तेव्हा त्यांनी विचार केला हजरत साहेबआंनी इच्छा किंवा आपले मत व्यक्त केले आहे का ? यासाठी इकडे तिकडे पाहू लागले तेव्हा त्यांनी लिहीलेले एक पत्र सापडले की त्याच्यात असे लिहिले हाते की, हम जहाँ रोज बैठा करत है वही जगह हमारे दफन के लिए मुनासीब है म्हणजेच त्यांच्या आवडीच्या जागेवर त्यांना दफण करण्यात आले. देवणी वेस, चौबारा रोड, उदगीर येथे आज ते आराम झोप घेत आहेत. आज ही ऐतिहासिक दर्गा समाधी म्हणून अस्तित्त्वात आहे.(8)

## सय्यद चांदशहाहुसेन कादरी :-

हा दर्गा उदगीर येथील निडेबन वेस जवळ आहे. सद्या हा दगा्र जुन्या उदगीर शहरात आहे. ह्या दर्ग्याजवळ कब्रस्तान व मस्जीद व त्यांच्या आजुबाजूस त्यांच्या मुजावर किंवा त्यांच्या सेवा करणा-यांना जहागिरी देण्यात आली आहे. यांच्या जन्मस्थानिविषयी कांही पुरावे माहिती लिखित न मिळाल्यामुळे जे कांही मौखित माहिती मिळाली आहे ती खालील प्रमाणे आहे. हजरत सय्यद चाँद शहाहुसेन कादरी (र.अ.) फार मोठे (वली) साधू होते. त्यांच्या काळात फारच त्यांची कीर्ती गाजली होती. येथील (उदगीर) लोक म्हणतात की तेथे एक विहिर आहे. तेथील पाण्याने आंघोळ (स्नान) केल्याने फोड नावाचा आजार बरा होतो. अशी आख्यायिका म्हटली जाते व त्याच बरोबर दर्ग्याच्या समोर एक दगडाची किस्ती (नाव) लोक भाविक येथे त्या नावेमध्ये खोबर, चुरमुरे (प्रसाद) म्हणून टाकीत असत आणि लोक आपल्या मनोकामना पूर्ण करीत असत व त्याचा संदल उरुस (11 रज्जब) ला कीरत असत व त्याचबरोबर स्थानिक लोक सहभागी होत असत. 9

या दर्गविषयी अजून एक आख्यायिका फार प्रचलित आहे आणि ते पूर्ण उदगीरमध्ये जुन्या लोकांमध्ये आज हा प्रचलित आहे. औरंगजेब फारच परेशान होते. त्यांना कित्येक दिवसापासून रात्रीची झोप नव्हती असे म्हटले जाते की, औरंगजेब उदगीर येथे येऊन चांदशहा हुसेन (र.अ.) यांचा आर्शिवाद घेतला तेथूनच त्यांना औरंगाबाद जिल्ह्यातील खुलताबाद (मराठवाडा) येथे जाण्याचा सल्ला दिला आणि त्यामुळेच औरंगजेबने हजरत सय्यद शहाहुसेन कादरी (र.अ.) यांच्या नावाने जहागीर दिली. आज सुध्दा त्यांची सेवा करणारे अनेक जहागीरदार असल्याचे दिसून येते.

**सय्यद शहा यतिम कादरी (र.अ.) :-**

हा दर्गा ता. उदगीर येथील औरंगपूरा भागात आहे. त्यांच्या बाजूस सखाजा सदरोद्दीन यांची दर्गा आहे व तसेच वाहत जाणारी लेंडी नदी सुध्दा आहे. सद्या ते आज जुन्या उदगीर शहराच्या लोकवस्तीमध्ये आहे. त्यांची समाधी (दर्गा) अत्यंत साधारण आहे. त्यांचा जन्म व मृत्यूविषयी लिखित स्वरुपात पुरावा नसल्याने कांही मौखिक माहिती मिळाली आहे. सय्यद नुरोद्दीन नुरलहक्क सय्यद यतित शहा कादरी पिरपाशा कादरी यांचे शिष्य होते. हजरत यतीम शहा कादरी आपल्या ध्यानमग्न राहत असे ते कोणालाही आशिर्वाद दिला तर त्यांचे सारे कार्य पूर्ण होत असते. त्यांच्याविषयी महत्त्वाची मौखिक माहिती अशी म्हटले जाते की, जर कोणी खोटे बोलले, गुन्हा केला, धोका दिल्यास किंवा नुकसान भरपाई मागितल्यास किंवा त्या व्यक्तीला त्याची वस्तू किंवा पैसा त्याच्या दर्ग्यावर ठेवून त्या वयक्तीस दिल्यास प्रकृती खराब होते अशा चमत्कारीत पध्दती विषयी माहिती दिली जाते. आज सुध्दा त्यांच्या दर्ग्यावर लोक भाविक फारच श्रध्देने येतात. हा दर्गा उदगीर येथील औरंगपूरा भागात अस्तित्वात आहे. (10)

**हजरत खाजा सदरोद्दीन ऊर्फ खाजाबाशा (र.अ.) :-**

हा दर्गा उदगीर शहरातील जुन्या वस्तीत किल्ल्याच्या समोर आहे. या दर्गाविषयी लेखी स्वरुपाचा पुरावा उपलब्ध झालेला नाही. कांही वर्षापुर्वी तारिख-ए-किल्ला उदगीर नवाब फरायरजंग बहादूर यांच्या उर्दु ग्रंथातुन व महाराष्ट्रशासन राजपत्र 1 में 1980 व कांही मौखिक स्वरुपात असलेली माहिती होय. दर्गा किल्ल्याच्या समोर आहे.त्याच आजू बाजूस कब्रस्तान आहे. त्यात एक मस्जिद आहे. तसेच दर्ग्याबाहेर एक मस्जिद त्याठिकाणी एक पाण्याची विहीर आहे. हा दर्गा एक मोठ्या दगड्याच्या चतुब-यावर वसलेले आहे. हा जमिनीपासून शंभर फूट उंच पसरलेला आहे. त्याच बरोबर दर्ग्यामध्ये जाण्यापूर्वी एक मोठी कमान आहे. त्यालाच मोठा दरवाजा म्हटले जाते. आणि दर्ग्याची घुमट आकार मोठा आहे.(11)

उदगीर येथील किंवा त्यांच्या परिसरातील जनतेचे म्हणणे असे आहे की, ही विहिर हजरत खाजा सदरोद्दीन (र.अ.) यांनी ही विहीर निर्माण केली आहे. येथील मुजावर खिदमतगार उदागीर बाबा हजरत खाजा सदरोद्दीनहे दोघे एकत्र बसत यांच्या प्रयत्नातून व सुफी पंथाच्या माध्यमातून मुस्लीम धर्माचा प्रचार केलाच परंतू हिंदु मुस्लिम सलोखा राखण्याचा प्रयत्न केला. त्यातुनच त्यांनी त्याकाळात प्रयत्न केला (12)

**हजरत शाहादुलबाशा र.अ. उदगीर :-**

हा दर्गा उदगीर पासून कांही अंतरावर आहे आणि तयांच्या आजूबाजूस छोटे ग्राम खेडे आहे. नळगीर पिंपरी हा गाव लागतो तेथून सुध्दा या दर्ग्याला जाता येते व तसेच हा दर्गा उंच अशा डोंगरावर आहे आणि दर्गा उदगीर शहरातून कोठेही थांबून पाहिल्यास किंवा सहजपणे नजरेस पडतो. या दर्ग्याला जाण्यासाठी किल्ला मार्गाने जाता येतो.

क्ष्यांच्या जन्माविषयी लिखित स्वरुपात माहिती उपलब्ध होत नाही. परंतू मौखिक स्वरुपात ही माहिती मिळते व तसेच प्रत्यक्ष पाहणी करुन सांगता येईल . दर्ग्याला जाण्यासाठी भाविकांना चालत जावे लागते. कारण जवळच्या र्माने गेल्यास किल्ला मार्ग पायी जावे लागते. कारण एकच व्यक्ती जाण्याइतकी वाट आहे. या वाटेतूनच जाताना उदगीरची नदी त्याला लेंडी नदी ओलांडून जावे लागते व तसेच पिंपरीचा पाण्याचा तलाव लागतो. तो फक्त उन्हाळ्याच्या वेळेस त्या तलावातून जाता येते. परंतू पावसाळ्याच्या वेळेस त्या तलावाच्या बाजूने जावे लागते. एकंदरीत दर्ग्याला जाताना तलाव लागतो व या दर्ग्याच्या पाय-याला लमानी (वंजारा) जातीचे तांडे लागतात. सारांशः या दर्ग्याला डोंगरातून जावे लागते व त्याच बरोबर दर्ग्याला जाण्यासाठी दुसरा एक मार्ग आहे तो म्हणजे पिंपरी गावाला बस (एस.टी. महामंडळ) किंवा जीप, टेंम्पो इ. वाहाननाने जाता येते व तेथे एक डोंगर चढावा लागतो आणि तेथील बाजूच्या मार्गाने वाहन घेवुन दर्ग्याला येते. हा र्गा उंच अशा डोंगरावर आहे त्या डोंगरावर अवतीभोवती कब्रस्तान आहे व येथे एक मस्जिद आहे व तसेच एक छोटा दगा आहे व मुख्य दर्गा म्हणजे हजरत शादाऊल बाशा र.अ. व महत्त्वाची गोष्ट म्हणजे उगवत्या सुर्या समोर आहे. कारण दरवाजा डघटल्याबरोबर सुर्य प्रकाश त्याच्या समाधीवर पडतो ह्या दर्ग्याला मुस्लिम धर्मापेक्षा हिंदू लोक जास्त जातात. परंतू ह्या दोन्ही धर्मातील लोक फार श्रध्देने येतात. असे म्हटले जाते की, जर लहान मुलाचे काम दुखत असल्यास ह्या दर्गयाला चांदीचे कान चढवीत असत (नवस म्हणून) आणि ताबडतोब कान दुखणे थांबत असे असा समज आजसुध्दा आहे. आणि करतात तसेच मुलगा, मुलगी झाल्यास पाळणा चढविणे किंवा घोडा चढविणे (चांदी) अशी प्रथा आज सुध्दा आहे. प्रत्यक्ष पाहणी करुन मुलाखत घेतली. (13)

**संदर्भ :**


| | | |
|---|---|---|
| 1. राजाराम थावरा राठोड | : | उदगीर चा इतिहास आणि स्मारके, प्रकाशक ना.य. डोळे, प्रथम आवृत्ती पृष्ठ क्र. 53 |
| 2. कित्ता | : | 34 |
| 3. स्वाने बुजर्गाणेदिनी सिलसिला ए , सय्यद पिरपाशा कादरी सय्य कासीमपाशा कादरीया, | : | पृष्ठ क्र. 24 |
| 4. कित्ता | : | पृष्ठ 26 |
| 5. महाराष्ट्र शासन राजपत्र 1980 | : | पृष्ठ क्र. 136 |
| 6. प्रत्यक्ष सर्वेक्षण | : | 5 मे 2008 |
| 7. प्रत्यक्ष सर्वेक्षण | : | 30 मे 2008 |
| 8. नवाब फरामजंगबहादूर, | : | तारीख - ए – किल्ला उदगीर, प्रकाशक – यगदूल हैद्राबाद, पृष्ठ क्र. 126 |
| 9. प्रत्यक्ष सर्वे | : | 31 में 2008 |
| 10. प्रत्यक्ष सर्वे | : | 5 में 2008 |
| 11. बशीरोद्दीन अहेमद देहली वाकियाते ममलेका | : | ए बिजापूर, खंड तिसरा, प्रकाशन, कर्नाटक उर्दू ॲकडमी, पृष्ठ क्र. 56 |
| 12. प्रत्यक्ष सर्वे | : | 31 में 2008 |